# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

## 2021-22

**क्र. साप्रवि/एफजीआर/15 दिनांक 15.11.2021**

विषय- सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दि. 01 जानेवारी 2016 ते 31 डिसेंबर 2018 या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतन धारकांना निवृत्तीवेतनाच्या अंशराशीकरणाचा सुधारित लाभ देण्याबाबत.

संदर्भ- 1) परिपत्रक क्र.साप्रवि/ एफजीआर/ 18 दि.11.09.2019.
2) शासन निर्णय क्र. सेनिवे-2019 /प्र.क्र.348 /सेवा-4 दि.05.02.2021
3) विधी समिती ठराव क्र.34 दि.21.06.2021
4) स्थायी समिती ठराव क्र.650 दि.14.07.2021
5) महानगरपालिका ठराव क्र.541 दि.27.08.2021
6) शासन पूरकपत्र क्र.सेनिवे-2019 /प्र.क्र.348 /सेवा-4 दि.12.07.2021

सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दि. 01 जानेवारी 2016 रोजी व त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांचे निवृत्तीवेतन/ कुटुंब निवृत्तीवेतन सुधारित करण्याबाबतचे निर्देश दि.11.09.2019 रोजीचे परिपत्रक क्र.साप्रवि/ एफजीआर/ 18 अन्वये प्रसृत करण्यात आले आहेत. तथापि दि.01.01.2016 ते दि.31.12.2018 या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित होणा-या मूळ निवृत्तीवेतनावर सुधारित अंशराशीकरणाचा लाभ देण्यात आलेला नव्हता.

महाराष्ट्र शासनाने दि.05.02.2021 रोजी क्र.सेनिवे-2019/प्र.क्र.348/सेवा-4 अन्वये अंशराशीकरणाबाबत सुधारित आदेश पारित केलेले आहे. सदर आदेश महानगरपालिका निवृत्तीवेतनधारकांना देखिल लागू करण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावास संदर्भीत क्र.3 ते 5 च्या ठरावान्वये अनुक्रमे विधी समिती/ स्थायी समिती व महानगरपालिकेची मंजुरी प्राप्त झालेली असून सदर मंजुरीच्या अनुषंगाने निवृत्तीवेतनाच्या अंशराशीकरणाच्या कालावधीत पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

1. दि. 01 जानेवारी 2016 ते 31 डिसेंबर 2018 या कालावधीमध्ये सेवानिवृत्त झालेले व यापूर्वी सहाव्या वेतन आयोगानुसार मूळ निवृत्तीवेतनावर अंशराशीकरणाचा लाभ घेतलेला आहे, अशा निवृत्तीवेतनधारकांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित होणा-या मूळ निवृत्तीवेतनावर आधारीत फरकाच्या रकमेवर अंशराशीकरणाचा लाभ देय होईल.
2. मुंबई महानगरपालिका (निवृत्तीवेतन) नियम, 1953 नुसार निवृत्तीवेतनाची अंशराशीकरण करणे ही कर्मचा-यांची ऐच्छिक बाब आहे. त्यामुळे दि. 01 जानेवारी 2016 ते 31 डिसेंबर 2018 या

कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांना सदर परिपत्रकानुसार अनुज्ञेय ठरणारे निवृत्तीवेतनाचे सुधारित अंशराशीकरण देखील ऐच्छिक राहील. निवृत्तीवेतनधारकांना सुधारित अंशराशीकरणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास, निवृत्तीवेतनधारकांनी ते ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहेत त्या कार्यालयाच्या खाते प्रमुखांकडे स्वतः लेखी अर्ज करावा. निवृत्तीवेतनधारकांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर खाते प्रमुखांनी लेखी मंजुरी देऊन सदर अर्ज मूळ निवृत्तीवेतन दाव्यासह प्रमुख लेखापाल (कोषागार) कार्यालयात सादर करावा. त्याबाबतची उचित कार्यवाही प्रमुख लेखापाल (कोषागार) निवृत्तीवेतन विभागामार्फत करण्यात येईल.

3. अंशराशीकरणाचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक 31.03.2022 आहे. सदर तारखेनंतर आलेले अर्ज खाते / विभागांनी स्वीकारू नयेत. निवृत्तीवेतनधारकांचे अर्ज प्राप्त न झाल्यास जुन्या दराने (सहाव्या वेतन आयोगानुसार) दिलेले अंशराशीकरण कायम राहिल.
4. सुधारित दराने अंशराशीकरणाचा लाभ मिळण्यासाठी निवृत्तीवेतनधारकांनी अर्ज केल्यानंतर व खाते प्रमुखांनी तो मंजूर केल्यानंतर निवृत्तीवेतनधारकास अर्ज मागे घेता येणार नाही.
5. सुधारित दराने अंशराशीकरणाचा लाभ मिळणेबाबत ज्या निवृत्तीवेतनधारकाने अर्ज केला आहे व सदर अर्ज खातेप्रमुखांनी मंजूर केल्यानंतर परंतू, अंशराशीत मूल्य मिळण्यापूर्वी निवृत्तीवेतनधारक मृत्यू पावला तर ते अंशराशीत मूल्य त्यांच्या कुटूंबनिवृत्तीवेतन धारकास (वारसास) देण्यात येईल.
6. सुधारित दराने अंशराशीकरणाचा लाभ देण्यात आलेल्या निवृत्तीवेतनधारकांच्या बाबतीत 15 वर्षांकरिता केली जाणारी दरमहा वजावट अंशराशीकरणाचा लाभ ज्या महिन्याच्या Input ला मंजूर केला जाईल त्या महिन्याच्या 01 तारखेपासून सुरु करण्यात येईल. व सदर तारखेपासून 15 वर्ष पूर्ण झाल्यानंतर वजावट केल्या जाणा-या रकमेची पुर्नस्थापना केली जाईल.
7. सुधारित दराने अंशराशीकरणाचा लाभ मिळण्यासाठी अर्ज केलेल्या निवृत्तीवेतनधारकांना मुंबई महानगरपालिका (निवृत्तीवेतन) नियमावली, 1953 मधील नियम 70 (अ) अन्वये आवश्यक असलेली वैद्यकीय तपासणी लागू होणार नाही.
8. तसेच, न्यायिक किंवा खात्यांतर्गत चौकशीची कार्यवाही सुरू असलेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत अंतिम आदेश पारित केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत सुधारित दराने अंशराशीकरणासाठी निवृत्तीवेतनधारकाने अर्ज केल्यास मुंबई महानगरपालिका (निवृत्तीवेतन) नियमावली, 1953 मधील नियम 70 (अ) अन्वये आवश्यक असलेली वैद्यकीय तपासणी लागू होणार नाही.

सर्व खाते प्रमुख, अधिष्ठाता रुग्णालये व सहाय्यक आयुक्त यांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या अखत्यारीतील आस्थापना कर्मचा-यांना वरील सुचनांप्रमाणे कार्यवाही करण्यास सुचित करावे .

सदर परिपत्रकाची प्रत महानगरपालिकेच्या Intranet वर ftp://hr.mcgm.gov.in/Circulars/GAD/Dy.C.A.Estt.2 या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/- दि.21.09.2021
श्रीम.उज्वला भोसले
उप प्रमुख लेखापाल (आस्था-2)प्र.

सही/- दि.23.09.2021
श्रीम.सुलोचना कवडे
प्रमुख लेखापाल (कोषागार)

सही/- दि.01.10.2021
श्री.रामदास आव्हाड
प्रमुख लेखापाल (वित्त)

सही/- दि.01.10.2021
श्री.मिलिन सावंत
सह आयुक्त (सा.प्र.)

सही/- दि.21.10.2021
डॉ.संजीव कुमार
अति आयुक्त (शहर)

सही/- दि.29.10.2021
श्री.पी.वेलरासू
अति.आयुक्त (प्रकल्प)

सही/- दि.12.11.2021
श्री. इ. सिं.चहल
मान. महानगरपालिका आयुक्त

परिपत्रक

2021-22

क्र. साप्रवि/एफजीआर/15 दिनांक 15.11.2021

प्रत ---------------------------------------------- यांना (-------- ज्यादा प्रतींसह) माहितीसाठी आणि आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

15/11/2021

उप प्रमुख लेखापाल (आस्था.2) यांजकरिता

<u>जोडपत्र-1</u>

| विद्यमान नियम | प्रस्तावित नियम |
|---|---|
| <u>नियम क्र.65(अ)</u><br>सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित होणा-या मुळ निवृत्तीवेतनाच्या 40% यापेक्षा अधिक होणार नाही एवढया भागाचे एका ठोक रकमेतील प्रदानासाठी जोडपत्र-2 मध्ये दिलेल्या दरानुसार अंशराशीकरण करता येईल.<br>सदर लाभ केवळ दि.1जानेवारी 2019 पासून अस्तित्वात येतील व सदर दिनांकास अथवा तदनंतर सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना लागू होतील.<br>जे कर्मचारी दिनांक 01 जानेवारी 2016 ते दिनांक 31 डिसेंबर 2018 पर्यंत सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत होणा-या मूळ निवृत्तीवेतनावर सुधारीत अंशराशी करणाचा लाभ देय असणार नाही. | <u>नियम क्र.65(अ)</u><br>सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित होणा-या मुळ निवृत्तीवेतनाच्या 40% यापेक्षा अधिक होणार नाही एवढया भागाचे एका ठोक रकमेतील प्रदानासाठी जोडपत्र-2 मध्ये दिलेल्या दरानुसार अंशराशीकरण करता येईल.<br>सदर लाभ केवळ दि.1जानेवारी 2019 पासून अस्तित्वात येतील व सदर दिनांकास अथवा तदनंतर सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना लागू होतील.<br>जे कर्मचारी दिनांक 01 जानेवारी 2016 ते दिनांक 31 डिसेंबर 2018 पर्यंत सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत होणा-या मूळ निवृत्तीवेतनावर सुधारीत अंशराशी करणाचा लाभ देय असेल. |

# <u>जोडपत्र-2</u>

## दरवर्षी रु.एक या निवृत्तीवेतनासाठी अंशराशिकरण मूल्य

| वय पुढील जन्म दिवशी | खरेदीच्या वर्षाप्रमाणे दर्शविलेले अंशराशिकरण मूल्य | वय पुढील जन्म दिवशी | खरेदीच्या वर्षाप्रमाणे दर्शविलेले अंशराशिकरण मूल्य | वय पुढील जन्म दिवशी | खरेदीच्या वर्षाप्रमाणे दर्शविलेले अंशराशिकरण मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| 20 | 9.19 | 41 | 9.075 | 62 | 8.093 |
| 21 | 9.187 | 42 | 9.059 | 63 | 7.982 |
| 22 | 9.186 | 43 | 9.040 | 64 | 7.862 |
| 23 | 9.185 | 44 | 9.019 | 65 | 7.731 |
| 24 | 9.184 | 45 | 8.996 | 66 | 7.591 |
| 25 | 9.183 | 46 | 8.971 | 67 | 7.431 |
| 26 | 9.182 | 47 | 8.943 | 68 | 7.262 |
| 27 | 9.180 | 48 | 8.913 | 69 | 7.083 |
| 28 | 9.178 | 49 | 8.881 | 70 | 6.897 |
| 29 | 9.176 | 50 | 8.846 | 71 | 6.703 |
| 30 | 9.173 | 51 | 8.808 | 72 | 6.502 |
| 31 | 9.169 | 52 | 8.708 | 73 | 6.296 |
| 32 | 9.164 | 53 | 8.724 | 74 | 6.085 |
| 33 | 9.159 | 54 | 8.678 | 75 | 5.872 |
| 34 | 9.152 | 55 | 8.627 | 76 | 5.057 |
| 35 | 9.145 | 56 | 8.572 | 77 | 5.443 |
| 36 | 9.136 | 57 | 8.512 | 78 | 5.229 |
| 37 | 9.126 | 58 | 8.446 | 79 | 5.018 |
| 38 | 9.116 | 59 | 8.371 | 80 | 4.812 |
| 39 | 9.103 | 60 | 8.287 | 81 | 4.611 |
| 40 | 9.090 | 61 | 8.194 | | |